ग्रंथाली वाचक चळवळीचे

# रुची

एप्रिल २००१ • मूल्य १० रु.



## सज्जनशक्तीस आवाहन !



## आठवीचे मराठी पुस्तक – त्यातील बरे-वाईट !

ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# रुची

'सुजन' नियतकालिक समाविष्ट

एप्रिल २००१
वर्ष २० वे, अंक ४ था, मूल्य १० रु.

संपादक : दिनकर गांगल
रुची - वार्षिक वर्गणी : संस्थांना १०० रु.
व्यक्तींना ६० रु.
डिमांड ड्राफ्ट, मऑ. 'ग्रंथाली' नावे

ग्रंथाली, इंडियन एज्युकेशन सोसायटीची म. फुले कन्याशाळा, बाबरेकर मार्ग, गोखले रोड (उ), दादर, मुंबई ४०००२८

अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'रुची' हे व्यासपीठासमान आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.

स.न.वि.वि.

'रुची'च्या या अंकात दोन उपक्रमांची झलक वाचण्यास मिळेल. एकतर 'ग्रंथाली-ज्ञानयज्ञा'तील भवरलाल जैन यांच्या पुस्तकाच्या निमित्ताने उठू पाहणारे एक (वैचारिक) आंदोलन. त्याचा प्रारंभ जळगावला झाला. तेथील चर्चेचा वृत्तांत ह्या अंकात समाविष्ट केला आहे. मुखपृष्ठावर चित्र त्या पुस्तकाच्या प्रकाशनाचेच आहे. दुसरी तशीच चर्चा औरंगाबादला, हा अंक वाचकांच्या हाती पडण्याआधी घडूनही गेलेली असेल ! वाचकांनी हे पुस्तक मागवून/मिळवून वाचावे. तर त्यांना या चर्चांचे प्रयोजन पटेल. विचारी, संवेदनाशील माणसांची सर्व बाजूंनी कोंडी झाली आहे. त्यांनी करावे तरी काय ? अशाच भेटीगाठी, सभा, चर्चा ह्यांतून मार्ग सापडेल. निष्क्रिय बसण्याने गुंता वाढेल; बदलांचे आकलन आणखी अवघड होईल. दुसरा उपक्रम म्हणजे 'ग्रंथाली'च्या ठाणे केंद्राने गेल्या डिसेंबरमध्ये व त्या आधी दोन वर्षे चालवलेला मुलांना वाचक चळवळीत सामील करून घेण्याच्या प्रयत्नांचा. हा आलेख अविनाश बर्वे यांच्या लेखनातून प्रकट होतो. खरे तर, महाराष्ट्रव्यापी व्हावा असा हा कार्यक्रम आहे. अविनाश बर्वे, श्रीधर गांगल व विनायक गोखले हे तिघेजण ठाण्यात तो नेटाने राबवतात.

एरवी, अन्य बरेच साहित्य या अंकात समाविष्ट आहे. 'रुची'ची वर्गणी भरलेल्यांना अंक पाठवायचा या धोरणाची अंमलबजावणी आता कडकपणे होत आहे. वेळीच 'रुची'ची पंचवार्षिक वर्गणी - फक्त २३० रु. — भरून टाकावी.

— संपादक

अनुक्रम

- मुक्काम शांघाय.../अजित गुप्ते/२
- चांगल्या समाजनिर्मितीसाठी सज्जनशक्ती संघटित व्हावी/३
- आठवीचे मराठी पाठ्यपुस्तक - विद्यार्थ्यांचे मनोगत/अविनाश बर्वे/६
- गीतातत्त्वज्ञान आणि व्यवहार/विजयालक्ष्मी आगाशे/१२
- वैज्ञानिक व पुस्तकांचे जग/प्रभाकर नानावटी/१३
- 'अभोगी मरण'/नंदिनी अविनाश बर्वे/१५
- 'मोटारींची मजा'/जयंत खेर/१७
- चित्रपट आणि जनतेचा सहभाग/माधव देशपांडे/१८
- 'अलिकडील' कविता, सामाजिक बांधिलकी... वगैरे
  सदानंद डबीर/२१
- 'प्रतिबिंब' माणसांची मनं नांगरणाऱ्या कविता
  डॉ. चंद्रकांत देऊळगावकर/२३

मुखपृष्ठावर—
१) वरचे छायाचित्र - कार्यक्रमारंभी समई प्रज्वलित करताना अशोक दातार, डावीकडून सुभाष भेंडे, वाय.एस. महाजन व भवरलाल जैन
२) तळचे छायाचित्र - भवरलाल जैन लिखित 'आजची समाजरचना, तिचे स्वरूप व पुनर्बांधणी' या पुस्तकाच्या प्रकाशनप्रसंगी. डावीकडून - सर्वश्री अच्युतराव अत्रे, वाय.एस. महाजन, भवरलाल जैन, एस.एफ. पाटील, कुमार केतकर व अशोक दातार

# चांगल्या समाजनिर्मितीसाठी सज्जनशक्ती संघटित व्हावी

## भवरलाल जैन लिखित पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यात मान्यवरांचा सूर

चांगल्या समाजाच्या रचनेसाठी समाजातील सज्जनशक्ती जागृत होऊन एकत्र यायला हवी, असा सूर प्रसिद्ध उद्योगपती व विचारवंत भंवरलाल जैन यांनी लिहिलेल्या 'आजची समाजरचना, तिचे स्वरूप व पुनर्बांधणी' या पुस्तकावरील चर्चासत्रात मान्यवर वक्त्यांनी जळगाव येथे व्यक्त केला.

जिल्हा बँकेच्या सभागृहात हा दिमाखदार प्रकाशन सोहळा झाला. 'महाराष्ट्र टाइम्स'चे संपादक कुमार केतकर यांच्या हस्ते 'ग्रंथाली'ने प्रकाशित केलेल्या या पुस्तकाचे प्रकाशन अभिनव पद्धतीने झाले. समाजस्थितीचे लाक्षणिक चित्र असलेल्या विस्कटलेल्या 'रुबिक क्यूब'मध्ये ठेवलेल्या पुस्तकाचे प्रकाशन केतकर यांनी केले. अध्यक्षस्थानी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. एस.एफ. पाटील होते. यावेळी प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ व माजी खासदार वाय.एस. महाजन, प्रसिद्ध अर्थसल्लागार व 'ग्रंथाली'चे अध्यक्ष अशोक दातार, ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. अच्युतराव अत्रे, प्रसिद्ध साहित्यिक व अर्थतज्ज्ञ सुभाष भेंडे हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते.

### वाय.एस. महाजन

समाजस्थितीवर विदारक प्रकाश टाकणारे व अंगावर शहारे आणणारे परंतु वस्तुस्थितीदर्शक पुस्तक असे या पुस्तकाचे वर्णन करून माजी खासदार वाय.एस. महाजन म्हणाले, की भारताची घटना सुंदर असूनही देशाचा कारभार विचित्रपणे सुरू आहे. राजकीय व्यवस्था कोलमडून पडते का ? असे वाटण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. कुंपण शेताला खात आहे. या विदारक स्थितीचे दर्शन या पुस्तकात आहे.

> **हे पुस्तक म्हणजे चिंतनाचे संचित**
>
> प्रसिद्ध उद्योगपती भवरलाल जैन यांनी लिहिलेल्या या पुस्तकाविषयी सर्व मान्यवर वक्त्यांनी गौरवोद्‌गार काढले. भवरलालजींच्या औद्योगिक साम्राज्य उभारणीच्या काळात शासन आणि राजकीय व्यक्तींच्या आलेल्या अनुभवांचे हे संचित आहे. केवळ पुस्तके वाचून त्यांनी हे तत्त्वज्ञान मांडले नाही, त्याला अनुभवाची जोड आहे. त्यात विविध सिद्धांत खच्चून भरले आहेत. पुस्तकाचा आवाका खूप मोठा असूनही सूत्रबद्धरीतीने तो कमी पानांमध्ये मांडण्याचे अवघड काम भवरलालजींनी केल्याचे सर्व वक्त्यांनी सांगितले.

भवरलालजींनी या पुस्तकात केलेल्या सूचनांचे स्वागत करून महाजन म्हणाले, की मुद्रास्फितीतील वाढ चिंताजनक आहे. महागाईने जनता त्रस्त आहे. त्यासाठी मुद्रास्फितीवर बंधन आणणे आणि खर्च आटोक्यात आणणे हे उपाय ठरू शकतील. काळ्या पैशाला आळा घालण्याचे धैर्य, खंबीरपणा आणि वाईटपणा घेण्याची शक्ती सरकारमध्ये हवी. राज्यकर्ते प्रामाणिक झाल्याशिवाय शासनव्यवस्था सुधारणार नाही. परंतु समाजही याला जबाबदार आहे, कारण प्रामाणिक माणसांना तो निवडून देत नाही, असे ते म्हणाले.

प्राथमिक व शेतीविषयकशिक्षण सक्तीचे करण्याच्या भवरलालजींच्या सूचनेचे स्वागत करून महाजन म्हणाले, की प्रगत राष्ट्रात राष्ट्रीय उत्पन्नातील ६ टक्के खर्च शिक्षणावर होतो. मात्र आपल्याकडे फक्त ३ टक्के खर्च होतो, ही दुर्दैवाची बाब आहे.

### अशोक दातार

भवरलालजींच्या या पुस्तकाने मी भारावून गेलो असे प्रारंभीच सांगून अशोक दातार म्हणाले की, सज्जनशक्ती संघटित व्हायला हवी, असे म्हणत असताना, तो सज्जनही हवा आणि त्याची शक्ती पण हवी ! दांडग्या शक्तीचे लोक दुर्जन असतात वा नसतात. पण सत्ता आणि स्वार्थ यांत ते मग्न असतात, समाजाशी ते फटकून वागतात, असे विश्लेषण त्यांनी केले.

समाजरचनेविषयी काय करता येईल, हा विचार या पुस्तकात मांडला आहे, हे या पुस्तकाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य असल्याचे सांगून दातार म्हणाले, की व्यवस्था आणि कायदा यांतील बदल अपेक्षिले आहेत. तसेच, त्यांनी शासनसंस्थेच्या अधिकारावर मर्यादा आणि नागरिकांच्या स्वातंत्र्याची व्याप्ती वाढवणे ही त्यांची सूचना योग्य आहे. यातील बऱ्याच सूचनांची अंमलबजावणी करता येऊ शकते हे भवरलालजींनी दाखवून दिल्याचे ते म्हणाले. पुस्तकाच्या वैशिष्ट्याविषयी दातार म्हणाले, की सूत्रबद्ध, कमी पानांचे व ठोस कृतिकार्यक्रम असलेले हे पुस्तक आहे. सर्वसामान्य नागरिकाला 'आपले राज्य' चालवण्याचे स्वच्छ व परखड शब्दांत वैयक्तिक निंदानालस्ती न करता योग्य मार्गदर्शन या पुस्तकात केले आहे.

### ॲड. अच्युतराव अत्रे

कायदेमंडळ आणि न्यायव्यवस्था या समाजरचनेच्या दोन अंगांविषयी ॲड. अच्युतराव अत्रे म्हणाले की, चांगल्या लोकांना राजकीय पक्ष तिकिट देतील का ?

आणि लोकही त्यांना निवडून देतील का? याचा विचार व्हायला हवा. कायदे जुने झाले, ते बदलण्याची आवश्यकता आहे, या भवरलालजींच्या विचारांचे स्वागत करून ते म्हणाले, की समाजहिताला आडवे येणारे कायदे बदलायला हवेत. नवीन कायदे मात्र सक्षम लोकांनी करायला हवे. कायदा आणि न्याय यांची सांगड घालायला हवी. भारतीय दंड संहितेत नवीन गुन्ह्यांचा समावेश करायला हवा. प्रशासन हा चक्रव्यूह असून समाजाचा अभिमन्यू झाल्याचे मत या पुस्तकात आहे, या अभिमन्यूला चक्रव्यूहातून बाहेर काढणे सज्जनशक्तीचे काम आहे, असे ते म्हणाले. न्यायालयीन निकाल निष्फळ ठरणारे कायदे करणे गैर असल्याच्या पुस्तकातील मताचे स्वागत करून ॲड. अत्रे म्हणाले की, शहाबानो प्रकरणाने हा प्रघात पडला आहे. सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिला असेल तर राजकीय सोयीसाठी तो बदलता कामा नये. हा नवीन व प्रभावी विचार भवरलालजींनी मांडला आहे.

कायदा हा न्यायाकडे नेण्याचा मार्ग आहे. कायदा हे ध्येय, साध्य होऊ शकत नाही. न्याय हे साध्य आहे, असे ते म्हणाले.

**सुभाष भेंडे**

व्यथित झालेल्या विचारवंताचे पुस्तक असे या पुस्तकाचे वर्णन करून सुभाष भेंडे म्हणाले, की विद्यमान स्थितीवरून असे वाटायला लागते, की लोकशाहीपद्धतीमुळे भ्रष्टाचार फोफावतो आहे की काय? लोकशाहीला आपण लायक आहोत की नाही, याचा विचार करायची वेळ आली आहे. कोणतेही क्षेत्र भ्रष्टाचारापासून अलिप्त नाही. यापासून मुक्त कसे व्हायचे हे कळत नाही. लोकप्रतिनिधींना परत बोलावण्याचा अधिकार मिळायला हवा, ही सूचना चांगली असल्याचे सांगून भेंडे म्हणाले, की सज्जनशक्ती एकत्र नसल्याने ही स्थिती निर्माण झाली आहे. सज्जनशक्ती निवडणुकीत सहभागी होत नाही, मतदान करत नाही, ही दुर्दैवाची बाब आहे. या पार्श्वभूमीवर भवरलालजींनी या पुस्तकाच्या रूपाने एक पणती लावली आहे. त्यांचे स्वप्न खरे होवो. त्यातील काही गोष्टींची पूर्तता होवो, नवीन समाजरचनेचा तो जाहीरनामा ठरो अशी अपेक्षा भेंडे यांनी व्यक्त केली.

**कुमार केतकर**

सज्जनांच्या वतीने भवरलालजींनी लिहिलेला हा जाहीरनामा असल्याचा गौरव करून कुमार केतकर म्हणाले, की समाजव्यवस्थेपुढे असलेल्या प्रश्नांची अचूक पद्धतीने मांडणी करणे हे उत्तराचे पहिले पाऊल ठरेल. त्यामुळे समाजव्यवस्थेत ही विकृती कधी निर्माण झाली याचा शोध घ्यायला हवा. मोगलांचे आक्रमण, ईस्ट इंडिया कंपनीचा प्रवेश, १८५७चा पहिला स्वातंत्र्यलढा या काळापासून ही विकृती आली आहे का? याचा विचार केला असता कोणत्याही धर्माची आक्रमणे आली तरी येथील हिंदू-भारतीय मानसिकता आहे, तशीच राहिली आहे. तीत बदल झालेला नाही, असे ते म्हणाले.

उत्तम समाजव्यवस्थेचे वर्णन करताना केतकर म्हणाले, की सर्वांना न्याय, प्रेमाची वागणूक आणि कोणी उपाशी नसणे ही उत्तम समाजव्यवस्था आहे. पण जगातील कोणत्याही देशात ती आज अस्तित्वात नाही. साम्यवाद, समाजवाद, भांडवलशाही या सर्व व्यवस्थांत भ्रष्टाचार दूर झाल्याचे उदाहरण नाही. सहकार क्षेत्रदेखील स्वाहाकार बनले आहे. अपेक्षा होती ती अध्यात्माकडून. पण अध्यात्मिक व धार्मिक संस्थांमधील राजकारण हे राजकीय लोकांना लाज वाटण्याइतके झाले आहे!

सज्जन माणसाची व्याख्या करायला हवी, असे मत व्यक्त करून केतकर म्हणाले, की सज्जन माणसे एकत्र आली की त्यांच्यातील 'अहं' आडवा येतो. आणि ही शक्ती विघटित होते. जनता पक्षाच्या राजवटीचा त्यांनी उदाहरणादाखल उल्लेख

'ग्रंथाली-ज्ञानयज्ञ' हा एक व्यापक व महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. विद्यमान मराठी जीवनाचे संचित अधोरेखित करावे आणि हा समाज ज्ञानाधिष्ठित व्हावा ह्यासाठी प्रयत्न करावे अशी 'ग्रंथाली-ज्ञानयज्ञा'ची धारणा आहे. त्यामध्ये विविध विषयांवर माहितीपूर्ण-ललित अशी एक हजार छोटेखानी पुस्तके प्रसिद्ध करावीत असा संकल्प आहे. पहिला टप्पा शंभर पुस्तकांचा. पैकी चाळीस पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. प्रकल्पाचा एकूण खर्च चार कोटी रुपये आहे. पैकी निम्मी रक्कम पुस्तकविक्रीतून उभी राहील. निम्मी रक्कम मुख्यत: 'नेटवर्किंग कॉस्ट'साठी आहे. उदाहरणार्थ, गावोगावी जाणे, तेथे बैठका घेणे, लोकांना त्यांच्या अभ्यास व छंद विषयांत लिहिण्यास प्रवृत्त करणे, जरूर तेथे लेखकांना लेखनवृत्ती देणे - हा खर्च बराच मोठा आहे. सरासरीने तो पुस्तकावर वीस हजार रुपयांपर्यंत येतो. ही रक्कम देणगी- पुरस्कार यांमधून उभी राहावी अशी अपेक्षा मनी धरली आहे. त्यामुळे ज्ञानयज्ञास जसे लेखन सहकार्य हवे तसे आर्थिक सहकार्यही! गेल्या दोन महिन्यांत लाभलेल्या या देणग्या व पुरस्कार—

| | रुपये |
|---|---|
| १) दाभोळ पॉवर कॉर्पोरेशन | २५००००=०० |
| २) टाटा फायनान्स | २०००००=०० |
| ३) जयंत नारळीकर | २००००=०० |
| ४) उद्धवराव वाघ | २००००=०० |
| ५) अप्पासाहेब राजळे | २००००=०० |
| ६) सौ. वंदना वसंत जोशी कै. श्रीमती विजया चिं. केतकर यांच्या स्मरणार्थ फ्लॅट नं ३, दुसरा मजला वनश्री वंदन, श्री बाग अलिबाग, जि. रायगड | १००००=०० |

केला. चांगल्या गोष्टी स्वीकारणे आणि वाईट गोष्टी सुधारणे हे तत्त्व अंमलात आणल्यास चांगला समाज निर्माण होऊ शकेल, असे केतकर म्हणाले.

### कुलगुरू पाटील

सज्जनशक्ती व सर्जनशक्ती जागृत करण्याचा चांगला प्रयत्न या पुस्तकातून झाल्याचे मत कुलगुरू एस.एफ. पाटील यांनी व्यक्त केले. निष्क्रियता हा सज्जन माणसाचा धर्म बनल्याची खंत व्यक्त करून कुलगुरू पाटील म्हणाले, की देशाचे भवितव्य बरे नाही. अशा उद्विग्न, निराश वातावरणात पुस्तकेच आपल्याला चांगला मार्ग दाखवतील. महात्मा फुले व महात्मा गांधी या 'महात्म्यां'ना पुस्तकांनीच मार्ग दाखवला होता. त्यामुळे या पुस्तकामुळे विचारशक्ती जागृत होईल. सज्जनशक्ती दुर्जनशक्तीचा पराभव करील, अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

### भवरलाल जैन

समाजवाद, साम्यवाद, भांडवलशाही या व्यासपीठावर एकत्र येऊ शकतात तर मग सज्जनशक्ती एकत्र का येऊ शकणार नाही ? असा भाषणाच्या सुरुवातीलाच प्रश्न उपस्थित करून भवरलाल जैन म्हणाले, की पुस्तकातील विचार हे पोटतिडिकीने लिहिले असल्याने ते अतिरेकी, अतिशयोक्तीपूर्ण आणि अतिरंजित वाटण्याची शक्यता आहे. पण ते योग्य आहेत, असे म्हटले तरी मला बरे वाटेल. प्राथमिक शिक्षणाचा समावेश घटनेच्या मार्गदर्शक तत्त्वांत न करता मूलभूत अधिकारात करावा, अशी माझी अपेक्षा आहे. प्रत्येक माणूस शिक्षित होणे ही प्राथमिक गरज आहे. अंधश्रद्धा, व्यक्तिपूजा आणि जातिधर्म यावर माणसाचा विश्वास आहे; कोणत्या मुद्द्यावर नाही, कारण शिक्षणाअभावी त्याला मुद्देच समजत नाहीत. प्राथमिक व शेतीविषयक शिक्षणासाठी अर्थसंकल्पात ठराविक टक्के तरतूद असायला हवी, अशी माझी आग्रही मागणी आहे, असे ते म्हणाले. गुलामी अंगात भिनली असल्याने क्रांती घडली नाही, आणि घडू शकत नाही, या विचारांशी असहमत व्यक्त करताना भवरलाल म्हणाले, की पूर्वी जे घडले ते पुढेही घडेल, असे मला वाटत नाही. अभिमन्यू बनलेल्या समाजाला चक्रव्यूहातून बाहेर काढायला हवे. सज्जन माणसाला मी मदत करीन, अशी भूमिका प्रत्येकाने घेतल्यास सज्जनशक्ती संघटित होऊ शकेल. 'अहं'शिवाय माणसाच्या जीवनाला दिशा मिळत नाही. पण तो इतरांना त्रासदायक ठरू नये. तो काबूत ठेवण्याचा विवेक हवा, असे आवाहन त्यांनी केले. तत्त्व, व्यवहार व कायदा यांचा संगम हवा. ते परस्परविरोधी असू शकतात. पण एकत्र येण्याचा प्रयत्न मात्र हवा, असे भवरलाल म्हणाले. सज्जनशक्ती जागृत, संघटित होणे हे अशक्यप्राय नाही, असे स्पष्ट करून ते म्हणाले, की काही तरी चुकते आहे, हे जनतेला कळू लागले आहे. दुर्जनशक्ती अन्याय करून त्याला आव्हान देईल तेव्हाच सज्जनशक्ती संघटित होईल. त्यामुळे या चळवळीत प्रत्येकाचा सहभाग हवा. चांगल्या माणसाला सहकार्य करा, त्याच्या पाठीशी उभे राहा, हीच माझ्या या पुस्तकाच्या उद्दिष्टपूर्तीची सुरुवात असेल, असे भावपूर्ण उद्गार भवरलालजी जैन यांनी शेवटी काढले.

प्रारंभी 'ग्रंथाली'चे अध्यक्ष अशोक दातार यांनी सर्वांचे स्वागत केले. केतकर यांनी भवरलाल यांना 'ग्रंथाली'तर्फे भेटवस्तू व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार केला. तसेच कार्यक्रमाला उपस्थित असलेले साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त कविवर्य ना.धों. महानोर यांचा सत्कार केतकर यांच्या हस्ते करण्यात आला. त्यांना 'ग्रंथाली-ज्ञानयज्ञा'च्या ४० पुस्तकांचा संच भेटीदाखल देण्यात आला. भवरलाल जैन यांच्या पुस्तकाच्या मुखपृष्ठाची संकल्पना असलेले कलावंत दीपक जोशी तसेच मुद्रक मोहन खैरे यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला.

प्रास्ताविक, सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन 'ग्रंथाली'चे दिनकर गांगल यांनी केले. यावेळी चित्रपट निर्माते किरण शांताराम, ना.धों. महानोर, दलुभाऊ जैन, जिल्हा पोलिस अधीक्षक डॉ. भूषणकुमार उपाध्याय, राजा मयूर, डॉ. सुभाष चौधरी, डॉ. चंद्रशेखर सिकची आदी मान्यवर उपस्थित होते.

('लोकमत'-जळगाव आवृत्तीवरून पुनर्मुद्रित)

### महाराष्ट्रात २० ठिकाणी पुस्तकावर चर्चासत्र

भवरलाल जैन यांचे हे पुस्तक 'ग्रंथाली' या मान्यवर वाचक चळवळ चालवणाऱ्या प्रकाशन संस्थेने प्रकाशित केले आहे. 'ज्ञानसत्र' या प्रकल्पातील प्रकाशित या पुस्तकावर चर्चा व्हावी, त्यातून सज्जनशक्ती जागृत व्हावी, या हेतूने महाराष्ट्रात २० ठिकाणी चर्चासत्रे आयोजित करणार असल्याची आणि त्यातील पहिले सत्र ८ एप्रिल रोजी औरंगाबादला घेणार असल्याची माहिती दिनकर गांगल यांनी यावेळी दिली.

### क्षणचित्रे

- कार्यक्रमाच्या सुरुवातीला व्यासपीठावर गेल्याबरोबर भवरलालजींनी वाय.एस. महाजन यांना पदस्पर्श केला तेव्हा उपस्थित जळगावकर रसिक भारावले.
- कार्यक्रमाचे व्यासपीठ हे प्रकाशन सोहळ्याला अनुरूप असे होते. पुस्तकांचे शेल्फ, पुस्तके, फुलझाडे, पडद्यावरील पुस्तकाचे मुखपृष्ठ, ठिकठिकाणी असलेले रूबिक क्युब हे आकर्षण ठरले. यासाठी जैन उद्योग समूहाचे उपाध्यक्ष अशोक जैन व त्यांचे सहकारी यांच्याविषयी कौतुकाचे उद्गार निघत होते.
- दिनकर गांगल यांचे सुटसुटीत व मोजके सूत्रसंचालन वैशिष्ट्यपूर्ण ठरले.
- प्रत्येक वक्त्याच्या बोलण्यात भवरलालजींच्या औद्योगिक क्षेत्रातील कामगिरीचा आवर्जून उल्लेख होत होता.